मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका तिजोरीत ६६० कोटींचा मालमत्ता कर जमा!

## तब्बल ४०० कोटींचा ऑनलाईन स्वरुपात नागरिकांनी कराचा केला भरणा

**पिंपरी-चिंचवड**

चालू आर्थिक वर्षात आजपर्यंत ६६० कोटींहून ( झउचउ) अधिक कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. यामध्ये तब्बल ४०० कोटींचा ऑनलाईन स्वरुपात नागरिकांनी कराचा भरणा केला आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये तब्बल सहा लाख नोंदणीकृत मालमत्ता आहेत. यामधील महापालिकेच्या हद्दीतील १८ झोन पैकी ११ झोनमध्ये मालमत्ता सर्वेक्षणाचे काम सुरु झाले आहे. याबरोबरच तब्बल ३,७६,६३२ मालमत्तांना भौगोलिक क्रमांक सुध्दा देण्यात आले असून ६५,000 मालमत्तांची अंतर्गत मोजणी सुध्दा करण्यात आलेली आहे. अंतर्गत मोजणी करण्यात आलेल्या मालमत्तांमध्ये ज्या नव्या मालमत्ता आढळणार आहेत त्यांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात येणार आहे.

मालमत्ता सर्वेक्षणामधूल मालमत्तांची संपूर्ण माहिती जमा केली जात आहे. या अभियानामार्फत अत्याधुनिक नकाशे प्रणालीद्वारे ब्लॉकची निर्मिती करून मालमत्तांना विशिष्ट मालमत्ता क्रमांक (यूपिक आयडी - युनिक प्रॉपर्टी आयडेंटिफिकेशन कोड) देण्यात येत आहे. ज्याप्रमाणे नागरिकांना आधार क्रमांक देण्यात आला आहे, त्याप्रमाणे मालमत्तेसाठी 'यूपिक आयडी' मिळणार आहे. यामुळे नागरिकांना मालमत्तेसंदर्भात सर्व माहिती एकाच क्लिकवर उपलब्ध होऊन त्यांचा वेळ वाचणार आहे.

### थकीत कराचा भरणा करुन विलंब शुल्क टाळा:!

ज्या नागरिकांनी अद्याप आपला थकीत कराचा भरणा केला नाही अशा मालमत्तांवर सध्या मालमत्ता जप्तीची नोटिस बजावून मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. त्याचबरोबर, थकबाकीदारांच्या थकीत रकमेवर २ टक्क्यांचे विलंब शुल्क सुध्दा लागू होत आहे.

त्यामुळे नागरिकांनी आपला थकीत मालमत्ता कर भरुन जप्तीची कटू कारवाई व वाढणारे २ टक्क्यांचे विलंब शुल्क टाळावे. असे आवाहन सुध्दा कर आकारणी व कर संकलन विभागाकडून करण्यात आले आहे.नागरिकांना आपल्या मालमत्तेची माहिती ठेवता येण्यासाठी, करामधील असमानता दूर करण्यासाठी 'मालमत्ता सर्वेक्षण अभियाना'चा लाभ नागरिकांना होणार आहे.

महापालिकेने सर्वेक्षणासाठी नेमलेले अधिकारी, महिला व सर्वेक्षणासाठी नेमण्यात आलेले कर्मचारी यांना महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरिकांनी बहुमोल सहकार्य केले असून यापुढेही मालमत्तेची माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले.

### 'डिजी लॉकर'च्या धर्तीवर आता 'प्रॉपर्टी लॉकर'ची सुविधा!

» नागरिकांना केंद्र सरकारद्वारे आपली कागदपत्रे 'डिजी लॉकर'च्या माध्यमातून एकत्रित सुरक्षित ठेवण्याची सुविधा पुरविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर महापालिका आता मालमत्तेसंदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे 'प्रॉपर्टी लॉकर'च्या माध्यमातून सुरक्षित ठेवण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देणार आहे. 'यूपिक आयडी'च्या माध्यमातून ही सुविधा मिळणार असून, आपल्या मालमत्तेसंदर्भातील माहिती एका क्लिकवर मिळणार आहे. यामुळे आपल्या मालमत्तेसंदर्भात आढावा घेण्यास नागरिकांना मदत होणार आहे. नागरिकांची डिजिटल गोपनीयता जपली जाणार असून, आपली कागदपत्रे महापालिकेला सार्वजनिक करण्याचा व न करण्याचा अधिकार नागरिकांकडेच असणार आहे. अशा विषयांची सखोल माहिती करसंवादाच्या माध्यमातून शनिवारी देण्यात आली.

# पूर्णानगर, शिवतेजनगर भागात तीव्र पाणीटंचाई

**चिखली । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पूर्णानगर, शिवतेजनगर परिसरात गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. तेथील नागरिकांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे, त्यांना महापालिकेशिवाय इतर खासगी पाणी टँकरही मागविणे भाग पडत आहे.

पूर्णानगर, शिवतेजनगर परिसर आता मोठ्या प्रमाणात विकसित झाला आहे. शेकडो सोसायटी आणि हजारो सदनिका विकसित करण्यात आल्याने लोकसंख्येचे प्रमाणही वाढले आहे. परंतु, पूर्वी ठरवून दिल्याप्रमाणे पाणीपुरवठा होत आहे. नवीन भागाला पाणीपुरवठा करण्यासाठी पूर्वीच्या जलवाहिन्यांना नवीन वाहिन्या जोडल्या



जातात. त्यातच हा परिसर उंच सखल आहे. त्यामुळे, उंचवटा असलेल्या भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होतो; तर सखल भागात अधिक प्रमाणात पाणी पुरवठा होतो. मात्र, समान प्रमाणात पाणी मिळावे, यासाठी वॉलची सुविधा नाही. परिणामी, पूर्णानगर, शिवतेजनगर या परिसरातील अर्ध्याहून अधिक भागाला पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार केल्यानंतर महापालिकेकडून टँकरने पाणीपुरवठा केला जातो. मात्र, दररोज पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याने अनेक वेळा नागरिकांनाही पदरमोड करून पाण्याचे टँकर विकत घ्यावे लागत आहे.

> “ महापालिकेच्या सारथी वेबसाईटवर पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत. मात्र, या तक्रारीची दखल न घेताच त्या निकाली काढल्या जात आहेत. या परिसराचा पाणीपुरवठा त्वरित सुरळीत करावा.
> –विकास गर्ग, अध्यक्ष, पूर्णानगर विकास कृती समिती

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेविका पौर्णिमा सोनवणे यांचे निधन

**पिंपरी न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेविका पौर्णिमा रविंद्र सोनवणे (वय ४४) यांचे आज (सोमवारी) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा असा परिवार आहे.

तळवडे, रुपीनगर भागातून २०१२ आणि २०१७ मध्ये दोनवेळा राष्ट्रवादी काँग्रेसकडून पौर्णिमा सोनवणे या महापालिकेवर निवडून आल्या होत्या. स्थायी समितीचे सदस्य



म्हणूनही त्यांनी काम केले आहे. मागील काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. आज सकाळी सव्वा आठच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

पौर्णिमा सोनवणे यांच्या पार्थिवावर निगडीतील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

# दूषित हवा शुद्धतेसाठी पिंपरी चौकात एअर प्युरिफिकेशन फाउंटन!

## यंत्राद्वारे पाण्याचे तुषार हवेत सोडून हवेतील प्रदूषण कमी केले; त्याचे काम अंतिम टप्प्यात

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड शहरातील दूषित हवा शुद्ध करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध १७ चौकांत एअर प्युरिफिकेशन फाउंटन उभारण्यात येत आहेत. त्या यंत्राद्वारे पाण्याचे तुषार हवेत सोडून हवेतील प्रदूषण कमी केले जाते. त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यातील एक फाउंटन पिंपरी चौकात उभारण्यात आला आहे.



दिल्ली शहराच्या धर्तीवर महापालिका ही नवी संकल्पना शहरात राबवित आहे. वायू व जल प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडून नवनवीन संकल्पना राबविल्या जातात. राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाअंतर्गत (एनसीएपी) शहरातील १७ चौकांत १२ ड्राय मिस्ट टाईप वॉटर फाउंटन आणि ९ ठिकाणी एअर प्युरिफीकेशन फाउंटन उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.लग्न समारंभात प्रवेशद्वारावर सुगंधी द्रव्य फवारले जाते. त्याप्रमाणे या फाउंटनचे काम असणार आहे. दर दहा मिनिटांनी हे फाउंटनद्वारे पाण्याचे तुषार उडविले जातात. त्यामुळे हवेतील धुळीकण जड होऊन खाली बसतात. चौकांच्या चारी रस्त्यांवर हे आकर्षक रचनेतील फाउंटन बसविण्यात येत आहेत.

पाणीपुरवठा करण्यासाठी त्याखाली ५०० ते १ हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधण्यात आली अहे. या कामासाठी ३ कोटी ९० लाखांचा खर्च अपेक्षित आहे. हा निधी राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाअंतर्गत केंद्र शासनाने दिला आहे. एअर प्युरिफीकेश(झळाींळ)न उभारण्याचे काम शहरात अंतिम टप्प्यात आले आहे.तसेच, मुव्हेबल फॉग कॅनन डस्ट सप्रेशनची ५ वाहनेही आहेत. पाण्याच्या टँकरप्रमाणे असलेली ती पाच वाहने रस्त्यांवर फिरून पाण्याचे तुषार उडवित आहेत. तसेच, मोशी कचरा डेपोतील बांधकाम राडारोडा प्रकल्पात एक कोटी खर्च करून डस्ट सप्रेशन यंत्रणा बसविली जाणार आहे.

शहरातील १८ मीटर रुंदीचे सर्व रस्ते यांत्रिक पद्धतीने आठवड्यातून एकदा पाण्याने स्वच्छ धुण्यात येत आहेत. त्यासाठी रोड वॉशरची ८ पैकी २ वाहने वापरण्यात येत आहेत. रस्ते धुण्यासाठी सांडपाणी केंद्रात (एसटीपी) प्रक्रिया केलेले वापराचे पाणी वापरले जाते. ती वाहने खरेदीसाठी १ कोटी ७५ लाखांचा खर्च करण्यात आला आहे. ते काम आठ क्षेत्रीय कार्यालयानिहाय तीन वर्षे मुदतीचे आहे.

वातावरणात तरंगणारे धुळी कण श्वसनाद्वारे फुफ्फुसात जातात. त्यामुळे नागरिकांना गंभीर आजार होतात. हे धुळीचे कण पाण्याच्या तुषारामुळे पाण्यासोबत जड होऊन खाली जाऊन बसतात. त्यामुळे हवा शुद्ध होण्यास मदत होते.

## दिव्यांग कल्याणकारी योजनेतंर्गत 'हयातीच्या दाखल्याचे' घरोघरी जाऊन होणार सर्वेक्षण

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभाग दिव्यांग कक्षाच्या वतीने विविध दिव्यांग कल्याणकारी योजना राबविणेत येतात. या योजनेअंतर्गत महापालिकेच्या हद्दीतील विविध दिव्यांग योजनांचा लाभ घेणा-या दिव्यांग व्यक्तींचा ङ्कहयातीचा दाखल्याङ्ख बाबत त्यांचे घरोघरी जाऊन समक्ष सर्वेक्षण करणेत येणार आहे.



सर्वेक्षण हे लाभ घेणा-या व नोंदणीकृत असलेल्या महापालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींचे घरोघरी जाऊन अक्षांश व रेखांश वर नोंदी घेवून तसेच गुगल टॅगिंग नुसार करण्यात येणार आहे. यामध्ये दिव्यांग व्यक्तींचे फेस रिडींग, थंम्ब इंम्प्रेशन व आयरीस ओळख डोळ्यांमार्फत ऑनलाईन नोंद घेणेत येणार असून तसेच त्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र / आधार कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड इ. स्कॅन करून ऑनलाईन वर अपडेट करणेत येणार आहे. लाभार्थ्यांचे नाव व पत्ता आधार नंबर, मोबाईल नंबर तसेच पालकांचे पुर्ण नाव, पत्ता व आधार नंबर, मोबाईल नंबर याच्या नोंदी (झचउ) घेवून या नुसार सर्वेक्षण करणेत येणार आहे.

ज्या दिव्यांग लाभार्थ्यांचा राहण्याचा पत्ता, मोबाईल नंबर बदललेला असेल अशा लाभार्थ्यांनी तात्काळ योग्य त्या पुराव्यासह लेखी अर्ज मुख्य कार्यालयात सादर करावा. महापालिकेकडे विविध योजनेत लाभ घेणारे दिव्यांग नागरिकांनी हयातीचा दाखला सर्वेक्षण बाबत महापालिकेने मे.अल्टवाईज प्रा.लि. या संस्थेची नेमणूक केलेली असून संस्थेचे ओळखपत्र धारक सर्वेअर हे शहरातील विविध योजनेत लाभ घेणारे दिव्यांग नागरीकांच्या घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणार आहेत.

त्यांना दिव्यांग नागरिकांनी सवीतोपरी सहकार्य करावे. संबंधित सर्व दिव्यांग नागरिकांनी आपले मुळ आधारकार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र,आधार कार्ड, लाभार्थ्यांचा मतदान कार्ड (वय वर्ष १८ पुढील) तसेच पालकांचे मतदान कार्ड, राहण्याचा पत्ता पुरावा, मोबाईल नंबर इ. कागदपत्रे सर्वेक्षण वेळी उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे.

दिव्यांग नागरीकांनी हयातीचा दाखल्या बाबत होणा-या सर्वेक्षणासाठी महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना सहकार्य करावे तसेच काही अडचणी असल्यास ८४५९८३४९२९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन समाज विकास विभाग, दिव्यांग कक्षाचे सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या समस्या तातडीने सोडवा

## शरद पवारांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवणार : अमोल कोल्हे



**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्रातील पाणबुडी प्रकल्प गुजरातला नेला जाणार असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येतोय. मात्र राज्यातील कोणताही प्रकल्प बाहेर गेला नाही, विरोधक निवडणुकीच्या तोंडावर कोणताही मुद्दा नसल्याने हा मुद्दा काढत आहे, असा आरोप उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केला.तर केंद्र सरकारला आमच्या हक्काचं हिसकावून घेऊ नका हे सांगण्याची हिंमत सरकारमध्ये नसल्याची टीका खासदार अमोल कोल्हेंनी केलीय. ते पुण्यात बोलत होते. अजित पवार म्हणाले, राज्यातून काही उद्योग उद्योग बाहेर गेलेले नाहीत. निवडणुकीच्या तोंडावर काही मुद्दे नाहीत म्हणून असे मुद्दे काढण्यात येतात. कालच मी मुख्यमंत्र्यांचे निवेदन ऐकले. त्यांनी स्पष्ट सांगितले आहे राज्यातून एकही उद्योग बाहेर गेलेला नाही. एकीकडे एक चित्र दाखवायचे आणि दुसरीकडे वस्तुस्थिती मात्र वेगळी असते. परंतु महाराष्ट्र सरकार हे केंद्र सरकारला ठामपणे नजरेला नजर भिडवून आमच्या हक्काचं हिसकावून घेऊ नका हे सांगण्याची हिंमत सरकारमध्ये नाही. तशी परिस्थिती सध्या राज्यात नाही, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, असे अमोल कोल्हे म्हणाले. अमोल कोल्हे म्हणले, दादा मोठे नेते आहेत. माझ्यासारखा कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेला नेता त्यांच्यासमोर लहान आहे. मायबाप जनता माझ्या कामांची पोचपावती देईल. माझ्यासमोर जे कोणी असेल त्यांच्यासमोर मी माझे विचार घेऊन जाईल. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसंकल्प अभियानाची सुरुवात शिरूर लोकसभा मतदारसंघातून करणार आहेत. त्यांचे मनापासून स्वागत करतो. जो शेतकरी आक्रोश मोर्चा निघाला या आक्रोश मोर्चाचा आवाज हा मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचला आहे. मुख्यमंत्री महोदय शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी हा जर शासकीय कार्यक्रम असतात तर मला वाटतं जास्त आनंद झाला असता शेतकऱ्यांच्या समस्या जास्त तातडीने सोडवण्यासाठी याचा याची मदत झाली. सिंधुदुर्ग किनाऱ्यावर होणारा पाणबुडी प्रकल्प गुजरातला जाणार यावर बोलताना अशोक चव्हाण म्हणाले, सत्ताधारी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री आहे. त्यांनी विचार केला पाहिजे. गुजरातला अधिक प्रकल्प चालले आहे. महाराष्ट्रामध्ये जास्त प्रकल्प आले पाहिजे. तर केंद्र सरकारला आमच्या हक्काचं हिसकावून घेऊ नका हे सांगण्याची हिंमत सरकारमध्ये नसल्याची टीका खासदार अमोल कोल्हेंनी (ओश्र घेश्रहश) केलीय. ते पुण्यात बोलत होते. अजित पवार म्हणाले, राज्यातून काही उद्योग उद्योग बाहेर गेलेले नाहीत. निवडणुकीच्या तोंडावर काही मुद्दे नाहीत म्हणून असे मुद्दे काढण्यात येतात. कालच मी मुख्यमंत्र्यांचे निवेदन ऐकले. त्यांनी स्पष्ट सांगितले आहे राज्यातून एकही उद्योग बाहेर गेलेला नाही. एकीकडे एक चित्र दाखवायचे आणि दुसरीकडे वस्तुस्थिती मात्र वेगळी असते. परंतु महाराष्ट्र सरकार हे केंद्र सरकारला ठामपणे नजरेला नजर भिडवून आमच्या हक्काचं हिसकावून घेऊ नका हे सांगण्याची हिंमत सरकारमध्ये नाही. तशी परिस्थिती सध्या राज्यात नाही, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, असे अमोल कोल्हे म्हणाले. अमोल कोल्हे म्हणले, दादा मोठे नेते आहेत. माझ्यासारखा कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेला नेता त्यांच्यासमोर लहान आहे. मायबाप जनता माझ्या कामांची पोचपावती देईल. माझ्यासमोर जे कोणी असेल त्यांच्यासमोर मी माझे विचार घेऊन जाईल. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसंकल्प अभियानाची सुरुवात शिरूर लोकसभा मतदारसंघातून करणार आहेत.

### महाराष्ट्रामध्ये जास्त प्रकल्प पाहिजे

**» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसंकल्प अभियानाची सुरुवात शिरूर लोकसभा मतदारसंघातून करणार आहेत. त्यांचे मनापासून स्वागत करतो. जो शेतकरी आक्रोश मोर्चा निघाला या आक्रोश मोर्चाचा आवाज हा मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचला आहे. मुख्यमंत्री महोदय शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी हा जर शासकीय कार्यक्रम असतात तर मला वाटतं जास्त आनंद झाला असता शेतकऱ्यांच्या समस्या जास्त तातडीने सोडवण्यासाठी याचा याची मदत झाली.महाराष्ट्रातील पाणबुडी प्रकल्प गुजरातला नेला जाणार असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येतोय. मात्र राज्यातील कोणताही प्रकल्प बाहेर गेला नाही, विरोधक निवडणुकीच्या तोंडावर कोणताही मुद्दा नसल्याने हा मुद्दा काढत आहे, असा आरोप उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केला.**

# मुंबई-पुणे द्रुतगतीवरील अपघातांमध्ये मोठी घट

## नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर संयुक्त दंडात्मक कारवाई

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** रस्ते विकास महामंडळ व महामार्ग पोलिसांच्या विविध उपाययोजनांमुळे यशवंतराव चव्हाण मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावरील अपघात घटले, परंतु वाहने अद्याप सुसाटच आहेत. या महामार्गावर भरधाव वाहने एका मिनिटात दोन किलोमीटर अंतर कापतात. त्यामुळे वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर होणारे अपघात कमी करण्यासाठी शासकीय पातळीवर दक्षता घेऊन रस्ते विकास महामंडळ व महामार्ग पोलिसांनी विविध उपाययोजना राबवल्या. यात अपघातग्रस्त ठिकाणी ठराविक अंतरावर सीसीटीव्ही कॅमेरे, वेग मोजण्यासाठी स्पीड गनचा वापर, गतिरोधक पट्टे, धोकादायक ठिकाणी सूचना फलक व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, आदी उपाययोजना करण्यात आल्याने यावर्षी होणाऱ्या अपघातात निम्म्याने



घट झाली आहे. महामार्ग पोलिस व परिवहन विभागानेही यावर्षी द्रुतगती मार्गावर लक्ष केंद्रित करून वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर संयुक्त दंडात्मक कारवाई केली. यातून काही मंत्री व वरिष्ठही सुटले नाहीत. याचा फायदा अपघात संख्या घटली. परंतु वाहनचालकांची वाहने अद्याप सुसाटच आहेत. द्रुतगती मार्गावर हलक्या वाहनांसाठी वेगमर्यादा ताशी १०० किलोमीटर, तर जड वाहनांसाठी ताशी ८० किलोमीटरची असतानाही हा नियम अनेकजण मोडताना दिसून येत आहे. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होतेच, तरीही वेग मर्यादेचे उल्लंघन केले जाते. त्यांना आता प्रबोधनाची गरज आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी राज्य महामार्ग पोलिसांनी फ्रान्स बनावटीचे 'मेस्टा फ्यूजन' हे स्वयंचलित यंत्र देशात सर्वात प्रथम येथील महामार्गावर बसवले आहे. हे यंत्र वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांची माहिती छायाचित्रांच्या पुराव्यासह एका क्लिकवर उपलब्ध करून देते. संबंधित वाहनांचे छायाचित्र टिपल्यानंतर महामार्ग पोलिसांच्या नियंत्रण कक्षामध्ये ते काही सेकंदातच उपलब्ध होते. संबंधित वाहनचालकाला एक हजार रुपयांचा दंड आणि त्याचा परवाना निलंबित करण्याचा प्रस्ताव आरटीओकडे पाठवला जातो.

# राज्यव्यापी रेशन दुकानदारांच्या संपात फूट

## 'या' संघटनेचा संपात सहभागी होण्यास नकार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील रेशन दुकानदार नव्या वर्षांपासून म्हणजेच आजपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. १ जानेवारी २०२४ पासून राज्यभरातील रेशन दुकानदारांनी बेमुदत संपाची हाक दिली होती. मात्र, या संपात आता फुट पडली आहे. ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकिपर फेडरेशन पुणे यांनी संपात सहभागी होण्यास नकार दिला आहे. सोबतच, राज्यातील जवळपास २५ हजाराहून अधिक रेशन दुकानदार संपात सहभागी नसल्याचा देखील दावा ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकिपर फेडरेशनच्या वतीने करण्यात आला आहे. तसेच, सरकारने तोडगा काढण्याचे आश्वासन आधीच दिले असून, संपाला अर्थ नसल्याचं फेडरेशननेच्या वतीने स्पष्टीकरण देण्यात आले आहे. आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी देशपातळीवरील ऑल इंडिया फेअर प्राईस शॉप डिलर्स फेडरेशनने बेमुदत संप पुकारला आहे. या बंदमध्ये अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ केरोसीन परवानाधारक महासंघ देखील संपावर असणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आजपासून पुण्यासह महाराष्ट्रातील रेशनदुकानदार बेमुदत संपावर जाणार आहेत. मात्र, असे असतानाच या संपात मोठी फुट पडली असल्याचे चित्र आहे. ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकिपर फेडरेशन पुणे यांनी संपात सहभागी होण्यास नकार दिल्याने रेशन दुकानदारांच्या संपात फूट पडल्याचे पाहायला मिळत आहे.



राज्यात सुमारे ५३ हजार रेशन दुकानदार असून, त्यांच्या अनेक प्रलंबित न्याय हक्क मागण्यांसंदर्भात केंद्र आणि राज्य सरकार सकारात्मक पाऊल उचलत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. आपल्या मागण्यासाठी रेशन वेळोवेळी करण्यात येणाऱ्या आंदोलनाची आणि मोर्चाची सरकारकडून दखल घेतली जात नसल्याचा आरोप रेशन दुकानदारांकडून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे सरकारने सचिवांच्या अध्यक्षतेखाली हिवाळी अधिवेशन काळात नागपूरला रेशन दुकानदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली, मात्र कोणताही ठोस निर्णय न घेता फक्त आश्वासन देण्यात आले. त्यामुळे महासंघाच्यावतीने नाईलाजास्तव ऑल इंडिया फेअर प्राईस शॉप डीलर्स फेडरेशनने आजपासून पुकारलेल्या संपात सहभाग होण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या आंदोलनात राज्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांनी सहभागी होण्याचे आवाहन महासंघाकडून करण्यात आले आहे. परंतु, ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकिपर फेडरेशनच्या वतीने संपात सहभागी न होण्याचा निर्णय घेण्यात आल्याने संपात फुट पडली आहे.

# पुण्यातील कोरेगाव भीमामध्ये २०६ वा शौर्य दिन उत्साहात

## अभिवादनासाठी भीम अनुयायांची गर्दी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** कोरेगाव भीमा या ठिकाणी आज २०६ वा शौर्य दिन साजरा होत आहे. शौर्य दिनाच्या पार्श्वभूमीवर कोरेगाव भीमा विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी नागरिकांना मोठी गर्दी केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळी विजय स्तंभाला अभिवादन केले. आज दिवसभरात लाखो आंबेडकर अनुयायी या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी येणार आहेत. मंत्री चंद्रकांत पाटील प्रकाश आंबेडकर केंद्रीय मंत्री रामदास आठवले, आमदार जितेंद्र आव्हाड हे नेतेही कोरेगाव भीमा या ठिकाणी येणार आहेत. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झालेल्या कोरेगावच्या लढाईचा दिवस अनुयायांकडून शौर्य दिन म्हणून साजरा केला जातो.

१ जानेवारी १९२७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विजय स्तंभास भेट दिली होती. या शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून लाखो आंबेडकर अनुयायी आज येणार आहेत. पहाटेपासूनच विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी लोकांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. २०६ वर्षांपुर्वी कोरेगाव भीमा इथं झालेल्या लढाईत महार आणि इतर समाजातील सैनिकांच्या पराक्रमुळे ब्रिटिशांनी पेशव्यांच्या सैन्याचा पराभव केला



होता. १ जानेवारी १९२७ ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी या विजय स्तंभास भेट देऊन हा इतिहास पुढे आणला. तेव्हापासून या ठिकाणी शौर्य दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. कोरेगाव इथे १ जानेवारी १८१८ मध्ये एक ऐतिहासिक लढाई झाली. ही लढाई इंग्रज आणि पेशव्यांमध्ये झाली होती. महार समाजातील सैन्याच्या जोरावर इंग्रजांनी पेशवाईविरुद्ध युद्ध पुकारले होते. हे युद्ध इंग्रजांनी जिंकल्यानंतर त्यांनी लढाईच्या स्मरणार्थ कोरेगाव भीमा येथे विजय स्तंभ बांधण्यात आला. दरवर्षी कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी रोजी विजयस्तंभ शौर्य दिन अनुयायांकडून मोठ्या उत्साहात साजरा होतो. महार सैनिकांच्या सन्मानार्थ येथील विजय स्तंभाला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी १ जानेवारीला महाराष्ट्रासह देशभरातून आंबेडकर अनुयायी यांच्यासह इतरही लाखोंच्या संख्येनं लोक या ठिकाणी येतात. सोहळ्यास उपस्थित राहू न शकणाऱ्या नागरिकांना घरबसल्या सोहळा पाहता यावा यासाठी सह्याद्री वाहिनीवरून १ जानेवारी रोजी सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. सकाळी ६:३० वाजता मान्यवर पाहुणे विजयस्तंभास अभिवादन करतील. ७:३० वाजता समता सैनिक दल, महार रेजिमेंट सेवानिवृत्त सैनिक आणि सैनिक दलातर्फे मानवंदना दिली जाईल. सकाळी ९:३० वाजता 'डॉ.बी. आर. आंबेडकर विज्डम बुकफेअर'चे उद्घाटन होईल, अशी माहिती बार्टीच्यावतीने देण्यात आली आहे.कोरेगाव भीमा या ठिकाणी आज २०६ वा शौर्य दिन साजरा होत आहे. शौर्य दिनाच्या पार्श्वभूमीवर कोरेगाव भीमा विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी नागरिकांना मोठी गर्दी केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळी विजय स्तंभाला अभिवादन केले. आज दिवसभरात लाखो आंबेडकर अनुयायी या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी येणार आहेत.